क्रमांक 176 / आस्था–5 / जेष्ठता सूची–17 / 2017.
पोलीस अधीक्षक रायगड यांचे कार्यालय
अलिबाग,दिनांक 1 / 02 / 2017.

विषयः–रायगड जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील स.पो.उप निरीक्षक पोलीस हवालदार / पोलीस नाईक / पोलीस शिपाई यांची दि1 / / 17 रोजीची तात्पुरती जेष्ठता सूची.

–––000–––

रायगड जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील सहा पो.उप निरीक्षक / पोलीस हवालदार / पोलीस नाईक / पोलीस शिपाई यांची दि.1 / 1 / 2017 रोजीची तात्पुरती जेष्ठता सूची सोबत जोडली आहे.

महाराष्ट्र शासन गृह विभाग शुध्दीपत्रक क्र.पीएमएन–0314 / 203 / प्र.क्र.68 / पोल5ब दि. 21 / 10 / 2016 नुसार राज्य राखीव पोलीस बलातील कर्मचा–यांची राज्य पोलीस दलात बदली करण्याकरीता विहित अटी व शर्ती नुसार जेष्ठता लावण्यांत आलेली आहे. रा.रा.पोलीस बल गटाकडील जिल्हा आस्थापनेवर बदलून येणारे कर्मचारी यांचे सेवाजेष्ठते संदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई यांचे न्यायालयात एम ए.980 / 15,एम.ए.981 / 15 असे दाखल असून प्रकरण न्याय निर्णयावर प्रलंबित आहे. तरी सदर जेष्ठता ही सदर न्यायनिर्णयाचे अधिन राहून निर्गमित करणेत येत आहे.

2 / – सदरची जेष्ठता सूची संबधीत कर्मचा–यांचे सेवा अभिलेखावरून तयार करण्यात आलेली असून सर्व संबधीत पोलीस कर्मचा–यांचे नजरेस आणून देण्यात यावी. सदर कर्मचा–यांच्या जेष्ठतासंबंधी अथवा काही टंकलेखनात आपले नेमणुकीतील कर्मचारी यांचे नांव वगळण्यांत आले असल्यास खालील नमुद नोंदी प्रमाणे त्रुटी / आक्षेप असल्यास,त्यांनी स्वतःसदर जेष्ठता सूची मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत स्वयंस्पष्ट अभिप्राय व आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यालयास कळवावे.

3 / – जेष्ठता सूचीमधील नोंदी संबधीत पोलीस कर्मचा–यांनी तपासून 1)संपुर्ण नांव **2)जात,प्रवर्ग,3)भरती दिनांक 4)जन्म दिनांक 5)पदोन्नतीचा दिनांक,6)सेवानिवृत्ती दिनांक 7)कर्मचा–यांचे नांव नमुद केले नसल्यास इत्यादी बाबीच्या नोंदी सेवाजेष्ठता सुचीमधील नमुद बाबीशी बारकाईने तपासून त्यांत काही विसंगती आढळुन आल्यांस तसे या कार्यालयास आवश्यक कागदपत्रासह कळवावे.तसेच सदर जेष्ठतासुचीमध्ये आपले हुददयाप्रमाणे जेष्ठतासूचीत नांवे आलेली नसल्यांस,अथवा चुकीचे ठिकाणी असल्यास,त्यांनी तात्काळ आस्थापना शाखेच्या निदर्शनास आणुन दयावे. जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र दिलेले नाहीत त्यांनी तात्काळ सादर करावे.**

4 / – सदरहु माहिती तपासण्याची जबाबदारी संबधीत पोलीस कर्मचा–याची राहील.

5 / – सदरहु सेवा जेष्ठतासूची संबधीत पोलीस कर्मचा–यांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी ही सर्वस्वी पोलीस ठाणे प्रभारी अधीकारी / राखीव पोलीस निरीक्षक / शाखा प्रमुख यांची आहे.

1.2

( आर.व्ही.दंडाळे )
पोलीस उप अधीक्षक(,मुख्यालय)
पोलीस अधीक्षक रायगडकरिता

प्रति,

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधीकारी
राखीव पोलीस निरीक्षक मुख्यालय अलिबाग
पोलीस निरीक्षक स्था.गु.अ.शाखा / नियंत्रण कक्ष / जि.वि.शाखा
वाहतुक मदत केंद्र बोरघाट / महाड